# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बुधवार दि. १७/०२/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११५ वी बैठक बुधवार दि. १७ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी ४.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १५) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १६) | श्री.शंकर स.इंगळे, अधिक्षक<br>उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | श्री. व्ही.जी.वाणी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : ११५/१**

अ) विषय- दि. १७/०२/२००९ रोजी झालेंल्या ११४ व्या बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबात.

---

बैठकीचे कार्यवृत्तांत तयार करण्याची कार्यवाही चालु असून सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पुढील बैठकीत सादर करण्यात येईल असे सचिव यांनी सांगीतले.

---

**<u>बाब क्रमांक ११५/२</u> पुनर्रचना**

विषय- अ) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी अखर्चित निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१ ते ५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता / पु.वि.२ यांनी असे निदर्शनास आणून दिले की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीतील रहिवाशांची इमारत दुरुस्तीची मागणी आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सदर इमारतींच्या दुरुस्तीकरिता पूर्वी रु.१५ कोटी प्राधिकरणाने एकदाच दुरुस्त करुन सोसायटयांना मालकी हक्क तत्वावर गाळे देण्याच्या अटीवर मंजूर केले होते परंतु रहिवाशी इमारतीची दुरुस्ती करुनसुध्दा इमारत मालकी तत्वावर घेण्यास तयार नाहीत व आता इमारतीची दुरुस्ती करुन देण्याबाबत मागणी करीत आहेत. अशा परिस्थितीतीत इमारतीची दुरुस्तीही होत नाही त्यामुळे इमारतीची स्थिती खालावते व भाडेकरु/रहिवाशी इमारत दुरुस्त केल्यानंतर मालकी तत्वावर घेण्यास तयार नाहीत. अशा परिस्थितीत निव्वळ जिवीत हानी होऊ नये व लोकांचे नुकसान होऊ नये म्हणून ही अपवादात्मक बाब विचारात घेणे गरजेचे आहे. पूर्वी मंजूर केलेल्या निधीनुसार इमारत दुरुस्तीचा कार्यक्रम राबवून पूर्ण करण्यात आला व त्या निधीपैकी काही निधी शिल्लक आहे. इमारतींना दुरुस्तीची गरज आहे व निधी शिल्लक आहे ही बाब प्राधिकरणाच्या नजरेस आणून इमारत दुरुस्तीची कामे घेण्यात येतील. आता मान्यतेसाठी ठेवलेला प्रस्ताव हा सोसायटयांनी इमारत ताब्यात घेतल्यानंतरच इमारत दुरुस्त करण्यात येईल असा आहे. त्यावर मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, अशा इमारतींची दुरुस्ती करण्यापूर्वी काय काय कामे करण्यात येणार आहेत ते मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात यावे व पी.एम.जी.पी.च्या बाबतीत जोपर्यंत धोरणात्मक निर्णय होत नाही तोपर्यंत दुरुस्ती करण्यास हरकत नाही. मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, एकदा धोरण झालेले असताना या इमारतींची जबाबदारी मंडळाने किती काळ घ्यावयाची ? सोसायटयांनी मालकी तत्वावर इमारती घेतल्या नाहीत तर कायमस्वरुपी दुरुस्तीसाठी पैसे आणायचे कोठून हा प्रश्न निर्माण होतो. यावर मा. सदस्य श्री. जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, त्या भाडेकरुंची अशी मागणी आहे की, त्यांना भाडेकरु म्हणून समजण्यात यावे. ते जर शक्य नसेल तर त्यांच्या इमारतींचा पुनर्विकास क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून करणे हा उपाय आहे.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, छोटया मोठया दुरुस्तीसाठी निधीची तरतुद नसल्यामुळे निधीची तरतुद करुन घ्यावी व हा अंतिम उपाय नसल्यामुळे शासनाकडे क्लस्टर डेव्हलपमेंट म्हणून पी.एम.जी.पी. चा पायलट प्रोजेक्ट सादर केला आहे त्यावर विचार करावा.

**ठराव क्रमांक : ११५/९४६**

पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता प्राधिकरणाने मुळ एकवेळ दुरुस्ती निधी उपलब्ध करुन दिल्याने सदर प्रस्ताव सर्वानुमते शिफारस करुन प्राकिरणाकडे पाठविण्यास मंजूरी दिली व प्राधिकरणाने मान्यता दिल्यानंतर दुरुस्तीची कामे वेळोवेळी मंडळाच्या निदर्शनास आणून हाती घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---oo---

विषय- **ब)** इ.क्र.१८१-१८७ भिक्की बिडी चाळ राम भाऊ भोगले मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७ ते ९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन इ.क्र.१८१-१८७ भिक्की बिडी चाळ राम भाऊ भोगले मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रुपये १२,५००/- प्रति चौ.मी. या ढोबळ दराने रु. १,१८,००,२५०/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले

**ठराव क्रमांक : ११५/९४७**

इ.क्र.१८१-१८७ भिक्की बिडी चाळ राम भाऊ भोगले मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रुपये १२,५००/- प्रति चौ.मी. या ढोबळ दराने रु. १,१८,००,२५०/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

---oo---

विषय- क) **अनुपालन अहवाल**
इ.क्र.६०२,६१०,६०६अे, ६०६बी इ.क्र.सकीना मंझील ना.म.जोशी मार्ग सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९-अ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन इ.क्र.६०२,६१०,६०६अे, ६०६बी इ.क्र.सकीना मंझील ना.म.जोशी मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रुपये ३,१६,६०,१४१/- या रक्कमेस सर्वानुमते सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११५/९४८</u>

इ.क्र.६०२,६१०,६०६अे, ६०६बी इ.क्र.सकीना मंझील ना.म.जोशी मार्ग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रुपये ३,१६,६०,१४१/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

------------------------------------------oo------------------------------------------

विषय- ड) १२९ अे, जगनाथ सेठ चाळ करी रोउ ( पिंपळेश्वर अ विंग )या राजीव गांधी निवारा प्रकल्प अंतर्गत बांधलेल्या इमारतीचा अेक वेळ दुरुस्तीचा कार्यक्रमात अंर्तभाग करणेबाबत.

--------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९-ब वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन विषयांकित इमारतीस दुरुस्त करण्यासाठी राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींच्या एकवेळ दुरुस्तीच्या शिल्लक निधीमधून प्राधिकरणाने मान्यता दिल्यानंतर दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक : ११५/९४९</u>

१२९ अे, जगनाथ सेठ चाळ करी रोउ ( पिंपळेश्वर अ विंग )या राजीव गांधी निवारा प्रकल्प अंतर्गत बांधलेल्या इमारतीचा एकवेळ दुरुस्तीच्या शिल्लक निधीमधून प्राधिकरणाने मान्यता दिल्यानंतर दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

------------------------------------------oo------------------------------------------

<u>बाब क्रमांक ११५/३</u>

विषय- <u>म्हाडा अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव.</u>
१) इ.क्र.१२-१८ मंगलवाडी मुंबई-०४
२) इ.क्र.१६३-६३अे, १६५-६५अे,१६७ शर्मा निवास न्यु प्रभादेवी

---------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११ ते १७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन इ.क्र.१२-१८ मंगलवाडी मुंबई-०४ व इ.क्र.१६३-६३अे, १६५-६५अे,१६७ शर्मा निवास न्यु प्रभादेवी या इमारतींना म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास अनुमती देण्याचे एकमताने ठरले.

**<u>ठराव क्रमांक : ११५/९४९</u>**

इ.क्र.१२-१८ मंगलवाडी मुंबई-०४ व इ.क्र.१६३-६३अे, १६५-६५अे,१६७ शर्मा निवास न्यु प्रभादेवी या इमारतींना म्हाड अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्यास सर्वानुमते मंजूरी दिली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**<u>बाब क्रमांक ११५/४</u>** ( उत्तर परिमंडळ )

विषय- अ) उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१९ ते २९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील १८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..४,०१,८७,३१९ /- व निव्वळ रक्कम रु. २,१७,७७,३१६/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक ११५/९५०</u>**

उत्तर परीमंडळातील एकूण १८ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**ब) विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३१ ते ४७-३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील ७८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१४,५७,७८,२४१ /- व निव्वळ

रक्कम रु. ७,८१,१३,०९८- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११५/९५१**

उत्तर परीमंडळातील एकूण .७८.उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

(

**बाब क्रमांक ११५/५ (दक्षिण परिमंडळ)**

अ) विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४९ ते ५७-अ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ४१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. ८९८७६०७४/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ४८५९९१००/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११५/ ९५२**

दक्षिण परीमंडळातील ४१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**विषय- ब)** दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ५९ ते ७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील १०६ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु२०४७३७५८०/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १२९०७९२५९./- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११५/९५३**

दक्षिण परीमंडळातील १०६ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**विषय- क**) दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ७५ ते ९३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील १०० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. १५,७०,०८,७७७/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ९,३२,२८,७९२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११५/ ९५४**

दक्षिण परीमंडळातील १०० उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११५/६**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१ भुकर पाहाणी क्र.३८१ परेल शिवडी विभाग नारायण निवास
२ भुकर पाहाणी क्र.८१०/१० माटुंगा विभाग हनुमान चाळ क्र.२

३ भुकर पाहाणी क्र.६३ एस.के.बोले रोड दादर गाला मॅन्शन व मेहेर ईस्तान
४ भुकर पाहाणी क्र.६६९/१० माटुंगा विभाग अपुर्व सह.गृह.संस्था
५ भुकर पहाणी क्र.१४१ भायखळा विभाग उपकर क्र.इ-१६२६ इ.क्र.६४, ७ व ८ कामाठीपुरा
६ भुकर पाहाणी क्र.१७७ लोअर परेल विभाग अंबावत भवन
७ अंतिम भुखंड क्र.१७४ टी.पी.एस-२ माहीम विभाग पीतांबर वाडी
८ भुकर पाहाणी क्र.१८४८ माहीम विभाग राजकमल
९ भुकर पाहाणी क्र.२१०/१० माटुंगा विभाग आनंद स्मृती
१० अंतिम भुखंड क्र.८२४-टी.पी.एस-४ माहीम विभाग वगळ हाऊस
११ भुकर पाहाणी क्र १३ व १/१३ परेल शिवडी गुल्लु खोजा चाळ
१२ भुकर पाहाणी क्र.१४३/७४ परेल शिवडी विभाग तय्यबीया मॅन्शन
१३ भुकर पाहाणी क्र.१५२/७४ परेल शिवडी विभाग गोप हाऊस
१४ भुकर पाहाणी क्र.८/७४ परेल शिवडी विभाग पतंगे बिल्डींग
१५ भुकर पाहाणी क्र.७५३ माझगाव विभाग सांघवी भुवन
१६ भुकर पाहाणी क्र.७३३ भायखळा विभाग उप.क्र.इ.७९२९ (१ व २)
१७ अंतिम भुखंड क्र.१००८ टी.पी.एस-४ शेट्ये बिल्डींग ( पार्वती मॅन्शन)
१८ भुकर पाहाणी क्र.१५५५ भायखळा विभाग एम.यु.रज्जाक रोड
१९ अंतिम भुखंड क्र.३९८ टी.पी.एस-४ एलीझाबेथ हाऊस
२० भुकर पाहाणी क्र.३६६३ भुलेश्वर विभाग सैफ ज्युबली स्ट्रीट
२१ भुकर पाहाणी क्र.९०३ भुलेश्वर विभाग हरीदास घेला दयाल बिल्डींग
२२ भुकर पाहाणी क्र.१७७८ भायखळा विभाग जमनादास ( दारुवाला ) बिल्डींग
२३ भुकर पाहाणी क्र.१६/५९६ मलबार कंबाला हिल रीट्रीट
२४ भुकर पाहाणी क्र.२४ व ४१ लोअरपरेल विभाग हाजी गुल मोहम्मद व आयशा बाई चाळ

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९५ ते १८५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी उपरोक्त.२४ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक : ११५/९५५</u>

मुंबई बेटावरील खालील २३ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पाहाणी क्र.३८१ परेल शिवडी विभाग नारायण निवास
२ भुकर पाहाणी क्र.८१०/१० माटुंगा विभाग हनुमान चाळ क्र.२
३ भुकर पाहाणी क्र.६३ एस.के.बोले रोड दादर गाला मॅन्शन व मेहेर ईस्तान
४ भुकर पाहाणी क्र.६६९/१० माटुंगा विभाग अपुर्व सह.गृह.संस्था
५ भुकर पहाणी क्र.१४१ भायखळा विभाग उपकर क्र.इ-१६२६ इ.क्र.६४, ७ व ८ कामाठीपुरा

६ भुकर पाहाणी क्र.१७७ लोअर परेल विभाग अंबावत भवन
७ अंतिम भुखंड क्र.१७४ टी.पी.एस-२ माहीम विभाग पीतांबर वाडी
८ भुकर पाहाणी क्र.१८४८ माहीम विभाग राजकमल
९ भुकर पाहाणी क्र.२१०/१० माटुंगा विभाग आनंद स्मृती
१० अंतिम भुखंड क्र.८२४-टी.पी.एस-४ माहीम विभाग वगळ हाऊस
११ भुकर पाहाणी क्र १३ व १/१३ परेल शिवडी गुल्लु खोजा चाळ
१२ भुकर पाहाणी क्र.१४३/७४ परेल शिवडी विभाग तय्यबीया मॅन्शन
१३ भुकर पाहाणी क्र.१५२/७४ परेल शिवडी विभाग गोप हाऊस
१४ भुकर पाहाणी क्र.८/७४ परेल शिवडी विभाग पतंगे बिल्डींग
१५ भुकर पाहाणी क्र.७५३ माझगाव विभाग सांघवी भुवन
१६ भुकर पाहाणी क्र.७३३ भायखळा विभाग उप.क्र.इ.७९२९ (१ व २)
१७ अंतिम भुखंड क्र.१००८ टी.पी.एस-४ शेट्ये बिल्डींग ( पार्वती मॅन्शन)
१८ भुकर पाहाणी क्र.१५५५ भायखळा विभाग एम.यु.रज्जाक रोड
१९ अंतिम भुखंड क्र.३९८ टी.पी.एस-४ एलीझाबेथ हाऊस
२० भुकर पाहाणी क्र.३६६३ भुलेश्वर विभाग सैफ ज्युबली स्ट्रीट
२१ भुकर पाहाणी क्र.९०३ भुलेश्वर विभाग हरीदास घेला दयाल बिल्डींग
२२ भुकर पाहाणी क्र.१७७८ भायखळा विभाग जमनादास ( दारुवाला ) बिल्डींग
२३ भुकर पाहाणी क्र.१६/५९६ मलबार कंबाला हिल रीट्रीट
२४ भुकर पाहाणी क्र.२४ व ४१ लोअरपरेल विभाग हाजी गुल मोहम्मद व आयशा बाई चाळ

---

**<u>बाब क्रमांक ११५/७</u>**

विषय- **<u>विशेष निधी</u>**

अ) मा.आमदार श्री.बशीर मुसा पटेल यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणे.

ब) मा.आमदार श्री.अरुण गवळी यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणे.

क) मा.आमदार श्री.दगडू सकपाळ यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणे.

ड) मा.आमदार श्री.भाई जगताप यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणे.

इ) मा.आमदार श्री.सैय्यद अहमद यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणे.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१८७ ते २२३ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीस आधीन राहून ( प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ११५/९५६**

विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीस आधीन राहून ( प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**बाब क्रमांक ११५/८**

विषय- मु.इ.दु.व पु मंडळ पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील रिक्त असलेले निवासी / अनिवासी गाळे खुल्या बाजारात विक्री करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २२५ ते २२७ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव हा अभ्यास करण्याकरिता पुढील बैठकीत चर्चेसाठी घेण्याचे ठरले. सदर प्रस्तावावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, यापूर्वी मंडळातर्फे शिल्लक असलेल्या व कोणीही घेण्यास तयार नसलेल्या पुनर्रचित इमारतीतील १२० चौ.फू. व १८० चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे वर्तमानपत्रात जाहीरात देऊन विकण्यात आलेले आहेत. त्याबाबत उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी पुढील बैठकीत सादर करावी.

**बाब क्रमांक ११५/९**

विषय- भुकर पाहाणी क्र.१२१ माझगाव विभाग इ.क्र.२१ ए,बा, सी,२१बी,२१ई व २१ नेसबीट मार्ग माझगाव हाजी कासम चाळ.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २२९ ते २३५ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सचिव यांनी उपरोक्त विषयाबाबत थोडक्यात माहिती मंडळाच्या सदस्यांना दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावातील पर्याय क्र.१ ची शिफारस करुन प्रस्ताव मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांजकडे पाठविण्याचे ठरले. .

**ठराव क्रमांक : ११५/९५७**

भुकर पाहाणी क्र.१२१ माझगाव विभाग इ.क्र.२१ ए,बा, सी,२१बी,२१ई व २१ नेसबीट मार्ग या पुनर्विकसित झालेल्या इमारतीच्या प्रस्तावातील पर्याय क्र.१ ची शिफारस करुन

प्रस्ताव मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे पाठविण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

---

## मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय

मा.सदस्या श्रीमती.उल्का पाटकर यांनी असे निदर्शनास आणले की, बोटावाला चाळीबाबत एक महिन्यात निर्णय घेणार होता. परंतु अद्याप निर्णय झालेला नाही. त्यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मंडळाने संपादित केलेल्या तसेच मंडळाकडे वर्ग झालेल्यामालमत्तांच्या खाजगी विकासकांमार्फत पुनर्विकास करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून त्यास अद्याप शासनाकडून मंजूरी मिळालेली नाही. जॉईंट व्हेंचरव्दारे पुनर्विकास करण्याबाबत शासनातर्फे मार्गदर्शक तत्वे अंतिम झाली नसल्यामुळे सदर बाबतीत पुढील कार्यवाही करता येत नाही. मंडळातर्फे पुनर्बांधणी करावयाची झाल्यास परत शासनाकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा लागेल. सदर विषयाबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्यासोबत चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी पुढील आठवडयात बैठक घेण्यात येईल .

मा. सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी वाकडी चाळीबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नाही असे निदर्शनास आणले असता निवासी कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, वाकडी चाळ येथील ७०% रहिवाशांमधील ८०% रहिवाशांनी पुनर्विकासासाठी दिलेली अपरिवर्तनीय (इरोव्हेकेबल) संमतीपत्रे मागे घेतल्याबाबत या कार्यालयास कळविले असून विकासकाने त्याविरुध्द न्यायालयात दावा दाखल केले आहे. मंडळाने तीन महिन्यात पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र द्यायचे किंवा नाही याचा निर्णय घ्यावा.असे न्यायालयाने आदेश दिले आहेत.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, ७०% संमती दिलेल्या रहिवाशापैकी पुन्हा काही रहिवाशी अवाजवी क्षेत्राची मागणी करतात व न दिल्यास आधी दिलेले अपरिवर्तनीय संमतीपत्र रद्द करण्याबाबत कळवितात. तरी असे प्रकार कुठेतरी थांबले पाहिजेत. कारण मुठभर लोकांकरिता संपूर्ण योजना खोळंबते. म्हणून धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी पुढील बैठकीत विधी सल्लागार/प्रा. यांच्याशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने माहिती देण्यात येईल असे सांगितले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की,मोतीवाणी चाळीतील ७ रहिवाशांना अद्याप खाली करण्यात आलेले नाही. त्यावर मा. मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, पु.वि.२ यांना आदेश दिले की, ८ दिवसांमध्ये पोलीस मदत घेऊन त्या ७ भाडेकरुंना इमारतीमधून सक्तीने खाली करुन घ्यावे व कामास सुरुवात करावी.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी कुलाबा संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाबाबत काय अडचणी आहेत अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, कुलाबा संक्रमण शिबीराची जागा महसुल विभागाने दिली असून त्या विभागाच्या अटीनुसार सदर जागेवर संक्रमण शिबीरच बांधणे अपेक्षित आहे. मंडळातर्फे त्या जागेवर संक्रमण शिबीर व रहिवाशांसाठी मालकी तत्वावर सदनिका बांधवयाच्या असल्यामुळे फक्त संक्रमण शिबीर बांधण्याची अट शिथील करण्याबाबतचा प्रस्ताव महसुल विभागास पाठविण्यात आला आहे. जोपर्यंत महसुल विभागाकडून सदर प्रस्तावास मंजूरी मिळत नाही तोपर्यंत त्या जागेवर भाडेकरुंसाठी मालकी हक्काच्या सदनिका बांधता येत नाहीत. काम सुरु करण्यापूर्वी महसुल विभागाची संमती लागणार आहे. मा. सभापती यांनी याबाबत तांतडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी एस.आर.ए. अंतर्गत दिलेल्या संक्रमण शिबीराचे गाळे संबंधित विकासकांकडून परत घेण्याबाबतच्या केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा केली असता उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांनी सदर कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी दादर येथील आकांक्षा या पुनर्रचित इमारतीतील १६ गाळे अनेक महिन्यांपासून बंद असून त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी विचारणा केली असता उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी माहिती दिली की, संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या असून त्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. मा. मुख्य अधिकारी यांनी या प्रकरणात सहमुख्य अधिकारी यांनी त्वरित कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी पेडर रोड येथील ऋषी व्हीला या इमारतीच्या दुरुस्तीचे काम मंडळाकडून चालू असताना घर मालकाने सदर दुरुस्तीचे काम बंद पाडले असून त्यामुळे रहिवाशांना नाहक त्रास सोसावा लागत आहे असे निदर्शनास आणले. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, अ.विभाग यांना आदेश दिले की, त्यांनी सदर घर मालकाविरुध्द मंडळाच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल पोलीसात तक्रार दाखल करावी व पोलीसांचे सहकार्य घेऊन काम पुन्हा चालू करावे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी चिखलवाडी येथील ए.आर.पी. इमारतीमधे असलेल्या वंजारी चाळीतील रहिवाशांना खाली करण्याबाबत संबंधित अधिकारी कार्यवाही करत नसल्याने नाराजी व्यक्त केली. त्यावर मा. मुख्य अधिकारी यांनी पुनर्रचना विभागास सत्वर कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

मा. सदस्य श्री. हरिष सणस यांनी असा मुद्दा मांडला की, प्रतिक्षानगर येथे तेलगु समाजाचा एक कम्युनिटी हॉल आहे. त्या हॉलमध्ये मागील १५ वर्षांपासून तेथे तेलगू समाजाचे सार्वजनिक कार्यक्रम होत आहेत. सदर हॉल हटविण्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली आहे. याबाबत मा.राज्यमंत्री महोदयांनी म.न.पा. च्या व मंडळाच्या अधिका-यांची संयुक्त बैठक घेतली होती.

मा.राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सदर जागा ही मुंबई मंडळाच्या अखत्यारित येत असल्यामुळे मुंबई मंडळाच्या सहमुख्य अधिका-यांना हया लोकांना मदत करण्याबाबत विनंती करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली की, या बैठकीत ब-याच विषयांवर वेळेअभावी चर्चा करण्याचे राहिल्यामुळे एक जोड बैठक पुढील आठवडयात लावावी यावर मा. सभापती दि. २४.२.२००९ रोजी घेण्यात येईल असे सांगून सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव/ निबंधक
इदुपु मंडळ

मा.मुख्य अधिकारी मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती मुं.इ.दु.व पु.मंडळ

११६ वी बैठक

कार्यालयीन टिप्पणी                    जा.क्र/निकाअ/दुवपु/            /२००९.
दिनांक:-

विषयः- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना व मंडळाच्या दि.२८.०५.२००९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तान्त.

सादर

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना व मंडळाच्या दि.२८.०५.२००९ रोजी दुपारी ०३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील गुलझारलाल सभागृहात संपन्न झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तान्त सोबत मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे.

मान्यता मिळाल्यानंतर संबंधीतांना कार्यवृत्तान्त पाठविण्यात येईल.

सोबतः- बैठकीचे कार्यवृत्तान्त.

९/६/०९
शाखा अभियंता/दुवपु.

सचिव तथा नि.का.अ./दुवपु.मंडळ.

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी/दुवपु.मंडळ.

मा.सभापती/दुवपु.मंडळ.